# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/08/2023 (बुधवार) सकाळ


---

## घरफोडी

**१) पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०.५ कि. मी. अंतरावरील मौजा बुट्टीबोरी येथे दिनांक २५/०७/२०२३ ते दिनांक ३१/०७/२०२३ चे ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– विकास सुखदेव आकरे, वय २९ वर्ष, रा. इंकमटॅक्स कॉलनी, वाडी हे दिनांक ३१/०७/२०२३ चे रात्री ०७.०० वा. दरम्यान सामान ठेवलेल्या ठिकाणी गेले असता तेव्हा दाराचे कुलुप तुटलेले दिसले व कडी उघडी होती आतमध्ये जावुन पाहीले असता ठेवलेल्या सामानापैकी एच. पी कंपनीचा सीपीयु किंमती अंदाजे ४०००/– रू. प्रिंटर किंमती अंदाजे १२०००/–रू. व मॉनीटर किंमती अंदाजे १७०००/– रू असा एकुण ३३०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक खंडारे पोस्टे बोरी मो. नं. ९९२३१५९१५३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत महालक्ष्मी किराणा दुकान आसोली ता. कामठी जि. नागपुर येथे दिनांक ३१/०७/२०२३ चे २२/०० वा. ते दिनांक ०१/०८/२०२३ चे ०७/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविकांत मनोहरराव वाडीभस्मे, वय ३६ वर्ष रा. आसोली ता. कामठी जि. नागपुर यांचे आसोली कामठी येथील दूकानात आत मध्ये जावून कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीच्या दुकानाच्या गल्ल्यात ठेवलेले किंमती अंदाजे १७,०००/–रु. व ईयरफोनचे पॉईट वैगरे किंमती अंदाजे १०००/– रु. असा एकूण १८,०००/–रुपयाचा मुद्देमाल दूकानाला लावलेले लोखंडी शर्टर कशाच्या तरी मदतीने वाकवून दूकानाच्या आत प्रवेश करुन चोरी करुन घेवून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार हरिश यंगलवार मो. नं. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

# जबरी संभोग

**पो.स्टे. कळमेश्वर :–** दिनांक ०५/०१/२०२३ चे १८.३० वा. ते दिनांक ३१/०७/२०२३ चे १२.०० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे– अदित्य गोंविदराव तालेवार,वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र. १०, दत्तमंदिरच्या मागे, कळमेश्वर,जि. नागपुर** याने पिडीत फिर्यादी सोबत ओळख करून जवळीक साधली तसेच यातील आरोपीने तिला प्रेमाचे व लग्नाचे आमीश दाखवुन व तिचे अल्पवयीन असल्याचा फायदा घेवून त्याने वेळोवेळी जबरीने तीचेसोबत शारीरीक संबंध प्रस्थापीत करून यातील पिडीतास गर्भवती केले होते. त्यानंतर पिडीतेने गर्भपाताची गोळी खाल्ली तर तिचा गर्भपात झाला, त्यानंतर सदर आरोपीने परत पिडीतेसोबत शारीरीक सबंध करून पिडीतेवर वारंवार लैंगिक अत्याचार केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (२) (जे), ३७६(२) (एन), सहकलम पोक्सो कायदा कलम ४, ६ प्रमाणे कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक गेडाम मॅडम मो. नं. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**